**वाचले :-**

१. आदेश क्र.साप्रवि/३अ/कावि/३३/२०२४ दिनांक ०७/०६/२०२४
२. आदेश क्र. साप्रवि/२/कावि/६६६/२०२४ दि. ०८/१०/२०२४
३. सहाय्यक आयुक्त,आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र. आमुका/१/कावि/८२०/२०२४ दि. ०४/१२/२०२४
४. सहाय्यक आयुक्त, भूमि आणि जिंदगी विभाग यांचेकडील पत्र क्र.भूजि/५/कावि/१९/२०२४ दि. ०९/१२/२०२४
५. मा.आयुक्त यांचा दिनांक ०६/ ०३ /२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८, सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१/कावि/८० /२०२५
दिनांक ०६/ ०३ /२०२५

**विषय** - लेखाधिकारी पदाचे कामकाजाबाबत...

**आदेश,**

उपरोक्त वाचले क्र. १ चे आदेशान्वये श्री.बलदोटा पुनमचंद, लेखापाल हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतून दिनांक ३०/०६/२०२४ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच श्री. आनंद जगन्नाथ गायकवाड यांना उपरोक्त वाचले क्र. २ चे आदेशान्वये उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

श्री.बलदोटा पुनमचंद, लेखापाल यांचे सेवानिवृत्तीनंतर त्यांचेकडील लेखाधिकारी या पदाचे भुमि आणि जिंदगी (विशेष नियोजन प्राधिकरण) या विभागाचे अतिरिक्त कामकाज व श्री. आनंद जगन्नाथ गायकवाड यांना उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर पदोन्नती दिल्यानंतर आरोग्य विभाग तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाचे लेखाधिकारी पदाचे कामकाज अन्य लेखाधिकारी यांचेकडे सोपविणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर लेखाधिकारी पदावरील अधिकारी संख्येने कमी आहेत. प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्यादृष्टीने लेखाधिकारी पदावर अधिकारी कार्यरत असणे आवश्यक आहे.त्यामुळे लेखाधिकारी / लेखापाल पदावरील कार्यरत अधिकारी यांचेकडे लेखाधिकारी पदाचे अतिरिक्त पदभाराचे कामकाज सोपविण्याची बाब विचाराधीन आहे.

| **अ.क्र** | **अधिकारी नाव व पदनाम** | **आस्थापना विभाग** | **नव्याने अतिरिक्त पदभार द्यावयाचे पदनाम व विभाग** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. देशमुखे सुरेंद्र रामचंद्र, लेखाधिकारी | लेखा | लेखाधिकारी, आरोग्य विभाग |
| २ | श्री.कोरके सुनिल लक्ष्मण, लेखापाल | पाणीपुरवठा | लेखाधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| ३ | श्रीम. कुलकर्णी सुचेता संजय, लेखापाल | शिक्षण | लेखाधिकारी, भुमि आणि जिंदगी (विशेष नियोजन प्राधिकरण) |

मी,आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रशासकीय कामकाजाच्या साईच्यादृष्टीने स्तंभ क्र.२ मधील नमूद अधिकारी यांचेकडे स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेले पदनामाचा अतिरिक्त पदभार सोपविण्यास मान्यता देत आहे. वरील अधिका-यांनी स्वत:चे मुळ आस्थापना असलेले विभागाचे कामकाज, तसेच यापूर्वी सोपविण्यात आलेल्या विभागाचे अतिरिक्त पदभाराचे कामकाज सांभाळून स्तंभ क्र.०४ मध्ये नमूद केलेले अतिरिक्त पदभाराचे कामकाज करावयाचे आहे. सदर अतिरिक्त पदभाराचे अनुषंगाने त्या पदास प्रदान केलेले अधिकार वापरण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून करण्यात यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
संबंधित अधिकारी
प्रत- १) लेखा २) लेखापरीक्षण विभाग ३) संबंधित विभाग